# भ्रष्टाचार

*सन्माननीय श्री आण्णा हजारे यांची 'भ्रष्टाचार' संबंधित प्रकरणांची चौकशीची मागणी सहजासहजी नाकारता येण्यासारखी नाही. भ्रष्टाचार झाला नाही असे छातीठोकपणे सांगणे धाडसाचे होईल. परंतु अशा चौकशीबाबतचा पूर्वानुभव पाहिला तर अशा चौकशीतून फायदा होण्याची कितपत शक्यता आहे? श्रीमती इंदिराजी पासून सुश्री जयललिताजी पर्यंत कितीतरी चौकशा झाल्या. फारच थोड्या प्रकरणात आरोप सिद्धही झाले. तरीपण त्यांची लोकप्रियता कमी झाली काय? राजकारणात त्यांचे महत्त्व कमी झाले काय? किंबहुना ते वाढलेच. त्यांची राजकारणावरची पकड जास्तच दृढ झाली. राजकारणी लोकसुद्धा अण्णांचे आरोप बिनबुडाचे आहेत असे प्ति आरोप करू लागले आहेत. आता पर्यंत भ्रष्टाचारा बद्दल खूप बोलले-लिहले गेले आहे. परेतु, त्यावर उपाय अभावानेच सुचवला आहे. दैनिक सकाळच्या २ मे २००३ च्या अंकात श्री. मारुति सा. भापकर यानी 'भ्रष्टाचारी राजकारण्याना पर्याय उभा करावा' असे आवाहन अण्णा हजारे, अरुण भाटीया, गो. रा. खैरनार, टी. एन् शेषन वगैरे प्रभुतीना केले आहे. अवतार कार्य समजून भ्रष्टाचार रुपी भस्मासुराचा वध करावा अशी प्रार्थना केली आहे. सैद्धांतिक दृष्टीकोणातून हा उपाय आसू शकतो. परंतु, व्यवहारात खूपच अडचणी आहेत. निवडणूक लढवण्यास खूप खर्च येतो. शेषन याना निवडणूक लढवण्यास आपल्या तत्त्वाना नुरड घालावी लागली. सर्वच स्वच्छ व्यक्ति निवडणूक जिंकू शकतील असे छातीठोक पणे सांगता येईल काय? महात्मा गांधी किंवा जयप्रकाश नारायण कदाचित जिंकू शकतील. पण सर्वच जिंकतील असे सांगणे धाष्टर्याचे होईल. जरी सर्व जिंकले तरी पुरेशी संख्या मिळणे दुरापास्त आहे. संख्या बनवण्याकरता आणखी लोकाना बरोबर घ्यावे लागेल. हे 'आणखी लोक' शुद्ध चारित्र्याचे मिळतील याचा भरवसा नाही. जयप्रकाश नारायण यानी सर्व पक्षाना एका व्यासपीठावर आणून मोठ्या संखेने निवडणुका जिंकून दिल्या. परिणाम काय झाला? निवडणूक जिंकल्यावर सर्वाना ध्येयाचा व जयप्रकाशजीचा विसर पडला. सर्वांचा मूळ स्वर्थी स्वभाव उघड झाला. सगळे विखुरले व जयप्रकाशजींचा पराभव झाला. म्हणून माझ्या मते या निस्वार्थी लोकाना निवडणुकीच्या रिंगणात उतरवून बदनाम करू नये. माझ्या मते उपाय असा असावा कीं, राजकारणी लोकावर जनतेचा अंकुश असावा.*

*आपले पूर्वज खरोखरीच हुशार होते. समाजातील प्रत्येक व्यक्तीने 'बहुजन हिताय' वर्तन करावे म्हणून अदृश्य पोलीस व न्याय व्यवस्थेची उभारणी केली. निर्गुण निराकार देवाची जनसामान्यांच्या मनात स्थापना केली. प्रत्येकाच्या कर्माची नोंद करण्याची कामगिरी देवावर सोपवली. त्यालाच न्यायाधीश नेमून फळे प्रदान करण्याची परिपूर्ण हक्क दिले. कर्म व फळाची सांगड फक्त याच जन्माशीच नव्हे तर जन्म जन्मांतराशी जोडून टाकली. अशा पोलिसाच्या तथा न्यायाधिशाच्या तावडीतून कोठला पामर सुटणार?*

*ही व्यवस्था अकालबाधित रहावी म्हणून आदर्श व्यक्तिमत्वे निर्माण केली. त्यांच्या जीवन चरित्रातून सर्व सामान्यानी निरनिराळ्या परिस्थितीत*

*कसे आचरण करावे याचे पाठ दिले. या मार्गदर्शनाने अतिसामान्य व्यक्तींना आचरणाचे आदर्श मिळाले. प्रभू श्रीरामापासून आजपर्यंत अशी कितीतरी आदर्श आपल्यापुढे आहेत. प्रभू रामचंद्रानी स्वानंदा पेक्षा प्रजेचा आनंद श्रेष्ठ मानला. कर्तव्यापुढे स्वसुख यत्किंचित लेखले. भगवान श्रीकृष्णानी कर्तव्याला श्रेष्ठत्व प्रदान केले. छत्रपती शिवरायानी राखेतून स्वातंत्र्य मिळवू शकतो हे दाखवून दिले. त्याकरता 'मराठा' शब्दाचा अर्थ बरोबर समजून मुसलमाना सुद्धा बरोबर घेतले. थोरल्या बाजीरावानी मोगल सत्ता अभेद्य नाही याची जाणीव करून दिली. राघोबादादानी शत्रूला, आपल्याच काय त्याच्या हद्दीतसुद्धा परास्त करू शकतो हे सिद्ध केले. झाशीच्या राणीने स्त्री सबला आहे याचा प्रत्यय दिला. लोकमान्यानी स्वातंत्र्य अधिकारवाणीने मागितले. शाहू महाराजानी तसेच कर्मवीरानी शिक्षणाची मक्तेदारी संपुष्टात आणली. शिक्षणाने कोणत्याही वर्णाचा मनुष्य उच्चवर्ण प्राप्त करू शकतो हे सोदाहरण सिद्ध केले बाबासाहेबानी. यशवंतरावानी गरीबसुद्धा एकत्र येऊन मोठी उद्योग निर्मिती करू शकतात याला विश्वास प्राप्त करून दिला. अशी कित्येक उदाहरण देता येतील. परंतु प्रभू रामचंद्रानंतर परिपूर्ण व्यक्तिमत्व झाले नाही. त्यामुळे वरील व्यक्तींमधे दोषही दिसतील.*

*देव आणि आदर्श व्यक्तिमत्वांचा प्रवास पूर्णत्वाकडे होण्या ऐवजी जास्त व्यवहारवादी (स्वार्थी) झाला. देव व मनुष्यामधें मध्यस्त निर्माण झाले. कर्मवाद मागे पडला. पैसे टाका हवे ते मिळवा. देव पैसेवाल्यांचा झाला. लोकामध्ये अंधविश्वास पसरला. ज्ञानाला बंदिस्त केले. काही थोडे ज्ञानाचे ठेकेदार बनले. ज्ञानाचा अधिकार ही थोड्यांची मक्तेदारी झाली. जसे जसे दिवस जाऊ लागले तसे तसे ही व्यवस्था जास्तच बळकट होत गेली.*

*कालांतराने लोकशाही व्यवस्था मान्य झाली. नवे मध्यस्त निर्माण झाले. नवनवीन क्लुप्त्या लढवून सत्ता मिळवण्याचे मार्ग शोधले व सत्तेचा उपयोग स्वतःपर्यंत सीमित ठेवण्यात यश मिळवले. पैसा हा सत्ता मिळवण्याचा व काबूत ठेवण्याचा राजमार्ग झाला. ज्याकडे पैसा त्याकडे सत्ता व ज्याकडे सत्ता त्याकडे पैसा हे समीकरण दृढ झाले. वैयक्तिक स्वार्था मुळे ही व्यवस्था निकामी झाली. परंतु सद्यः स्थितीत लोकशाहीला पर्याय नाही. लोकशाहीच्या सीमे मध्येच उपाय शोधला पाहिजे. एकाध दुसऱ्या प्रकरणाची चौकशी करून 'जन हिताय' बदल होईल हे मान्य करणे अवघड आहे. असे शक्य नाही तर यावर काहीच उपाय नाही काय? माझ्यामते उपाय आहे. याकरता सुरवात अर्थात तथाकथित राजकीय नेत्यापासूनच व्हावयाला हवी. सत्ता ही जनकल्याणाकरता, व जनसेवा हाच फक्त सत्तेचा राजमार्ग हे सर्वानी समजून घेतले पाहिजे. सत्तेचे आकर्षण कमी करून राष्ट्रप्रेम वाढवण्यावर भर द्यावा लागेल. हा उपाय खात्रीशीर असू शकतो. मला सुचलेले कांही नियम खाली दिले आहेत. हे नियम तसेंच किंवा सुधारून वापरात आणता येतील.*

*उमेदवार तथा जनप्रतिनिधीचे जीवन पूर्णपणे पारदर्शक असावे. पाश्चात्य देशा मध्ये सर्व सामान्य व्यक्तीच्या विवाहबाह्य लैंगिक सम्बंधाकडे कानाडोळा करतात. परंतु, जनप्रतिनिधीला कोठलीही सूट नसते. हे तत्त्व व्यवस्थित समजून घेणे आवश्यक आहे. म्हणून ज्याला जनप्रतिनिधी*

*व्हावयाचे असेल त्याने आपल्या व नातेवाईकांच्या आर्थिक बाबींची माहिती सर्व जनतेला द्यावी. जनप्रतिनिधीना आमदार खासदार संबोधण्या ऐवजी जिल्हासेवक, राज्यसेवक, जनसेवक, राष्ट्रसेवक वगैरे नावाने संबोधावे (नगरसेवक, शिक्षणसेवक या नांवाना विरोध नाही तर तर जनसेवक म्हणायला विरोध नसावा). उमेदवाराला मतदानात ठराविक टक्केवारी मिळाली नाहीतर एक लाख रुपयांचा दंड व भविष्यात कोठलीही निवडणूक लढवण्यास बंदी. उमेदवार ज्या पक्षातर्फे निवडणूकी करता अर्ज भरत असेल त्या पक्षाचा निवडणूकीच्या तारखे पूर्वी सलगपणे सहा वर्षे सभासद असावा. जर अपक्ष म्हणून अर्ज भरत असेल तर निवडणूकीच्या तारखे पूर्वी सलगपणे सहा वर्षे कोठल्याही पक्षाचा सभासद नसावा. अशा प्रकारे राजकारण संधीसाधु तसेंच स्वार्थी लोकाकरता नीरस करावे जेणे कारण फक्त निःस्वार्थी व्यक्तीच राजकारणात जनसेवेच्या भावनेने उतरतील. हे करण्या करता देशभर विचारमंथन झाले पाहिजे. जे नियम बनतील त्याना पूर्णत्व जरी देता आले माही तरी पळवाटा बुजवण्यात यश आले पाहिजे.*

*असे नियम केले तर निस्वार्थी लोक निवडणूकीच्या रिंगणात उतरतील परंतु अशा लोकाकडे पैसा असण्याची शक्यता कमी. या करता निवडणुकीचा खर्च सरकारने पूर्णपणे करावा (नाही तरी सध्या हा खर्च अप्रत्यक्षपणे सरकारच करते ना? जे कोणी पक्षनिधीला साह्य करतात ते कर सवलती मिळवून दामदुपटीने आपला पैसा वसूल करतातच ना? म्हणजे हा भार सध्या सरकार म्हणजे जनताच उचलते. फरक एवढाच की हा खर्च अंधारा ऐवजी उजेडात होईल व तो कितीतरी कमी असेल.).*

*मध्यस्थ, स्वार्थ व पैसा यापासून आपण जोपर्यंत फारकत घेत नाही तोपर्यंत भ्रष्टाचार होणारच. तेव्हा किती किती समित्या नेमणार? चौकशी समित्या नेमून वेळेचा अपव्यय कशासाठी? त्यापेक्षा भ्रष्टाचार होणारच नाही असाच उपाय केला पाहिजे. या उपायाची सुरवात वरून करावी व जरूर भासल्यास खाली आणावी.* ***आणि हे सर्व करण्याची जबाबदारी अण्णा हजारे, गो. रा. खैरनार, टी. एन्. शेषन वगैरे प्रभुतिनी घ्यावी****. जनतेने त्याच्या मागे खंबीरपणे मार्गक्रमण करावे. एकदा राजकारणाची संरचना सुधारली कीं, राजकारण जनताभिमुख होण्यास वेळ लागणार नाही.*